पुण्य नगरी

# फार्मसी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी




**हिंगणघाट :** तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसी, कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये स्टुडंट्स इंडक्शन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. उमेश तुळसकर तर प्रमुख अतिथी म्हणून विद्या विकास शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. नयना शिरभाते, समुद्रपूर येथील प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य तथा आयोजक डॉ. महेंद्र गुंडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात प्रतिमा पुजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांना नवीन वातावरणाशी एकरूप व मोकळे करणे, बॅचमध्ये तसेच प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये संबंध निर्माण करणे, जागरूकता, संवेदनशीलता आणि स्वतः ची समज विकसित करणे या उद्देशासह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. महेंद्र गुंडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची माहिती दिली.

महाविद्यालयातील सुविधांसह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. प्रमुख पाहुणे डॉ. किशोर रेवतकर यांनी आपले ज्ञान, आनंदी जीवन आणि शिक्षणाचे महत्त्व या शब्दांत उपस्थितांना संबोधित केले. संस्थेच्या सचिव डॉ. नयना तुळसकर यांनी शिस्तबद्ध शिक्षणाच्या महत्त्वावर भर दिला आणि त्यांनी डी. फार्म कोर्सनंतर आरोग्य सेवा व्यवसायातील मार्ग आणि संधी याबद्दल विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. उमेश तुळसकर यांनी शिक्षण प्रक्रिया, शिकण्याची प्रक्रिया आणि कार्यप्रक्रियेत फरक सांगितल. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यातील हा नवीन टप्पा आत्मविश्वासाने आणि दृढनिश्चयाने स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अंजू तन्ना यांनी केले तर आभार प्रा. राकेश जोशी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## महात्मा फुले आधुनिक भारताचे

Wardha Edition
Nov 29, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com